फक्त सभासदांकरिता

स्थापना: २९ मे १९६२

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल मु.पो.मुटाट,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग: पिन 416803.**

**फोन : ( ०२३६४ ) २४७५२१**

**संचालित**

**१. डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,मुटाट**

**२. कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय,मुटाट**

**३. डॉ. श्री.र.लेले हायस्कूलची कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे**

## ६२ वा

## वार्षिक अहवाल

## आणि

## २०२३-२४ या वर्षाची हिशेब पत्रके

मुंबई कार्यालय:
कार्याध्यक्ष : श्री विनायक कृष्णाजी लेले,
१५/ ब,स्वाती, अमृतकुंभ सोसायटी,
चितळे पथ, दादर, मुंबई- ४०००२८.
दूरध्वनी: २३८७६०३६

मुटाट कार्यालय:
मुख्य कार्यवाह : श्री सुभाषचंद्र गणेश परांजपे
डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल,
मु.पो.मुटाट,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग: पिन- ४१६८०३.
दूरध्वनी: ( ०२३६४ ) २४७५२१

**Registered under:**

संस्था नोंदणी कायदा :
21/1860 अन्वये नोंदणी क्र.बिओएम् /63/आर् एन्आर्
Societies Registration Act,1860
No. BOM/63/RNR

मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, 1950
अन्वये नोंदणी क्र.एफ् / 2046 (मुंबई),
Bombay Public Trust Act, 1950
No. F/2046 (Bombay/Mumbai)

नोंदणी कार्यालय : मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा: श्री विनायक कृष्णाजी लेले, १५/ब, स्वाती, अमृतकुंभ सोसायटी, चितळे पथ, दादर, मुंबई- ४०००२८.

(नोंदणी कार्यालयाचा जुना पत्ता : द्वारा श्री.सुहास चिरपुटकर, मुकुंद भुवन , गावदेवी, मुंबई ४००००७,
डिसेंबर २०१७ पासून रद्द करण्यात आला आहे) .

PAN : AAATM5432E

मंडळास दिलेल्या देणग्या आयकर कलम 80 G खाली, प्रधान आयकर आयुक्तांच्या दिनांक 24 मार्च 2022 च्या आदेशानुसार मुल्यांकन वर्ष 2022-23 ते मुल्यांकन वर्ष 2026-27 या कालावधीसाठी आयकर सवलतीस पात्र आहेत.

Donations are Exempted u/s 80 G of Income Tax Act 1961. Order dated 24-03-2022 issued by Principal Commissioner of Income Tax. Valid From AY 2022-23 To AY 2026-27.

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

आद्य संस्थापक: कै. डॉ. श्रीधर रघुनाथ लेले

**विश्वस्त**

श्री अनंत श्रीधर लेले    डॉ.दिलीप केशव राणे    श्री. काशिनाथ रत्नोबा पाळेकर

## कार्यकारी समिती (कार्यकाल: २०२२ ते २०२७)

| अध्यक्ष : श्री. विश्वासराव रामचंद्र पाळेकर | | | |
|---|---|---|---|
| उपाध्यक्ष | श्री. धनंजय गणेश परांजपे, | उपाध्यक्ष | डॉ. हेमलता माधव पुरंदरे |
| कार्याध्यक्ष | श्री. विनायक कृष्णाजी लेले, | कार्योपाध्यक्ष | श्री. जितेंद्र मोतीराम साळुंके |
| कार्योपाध्यक्ष | श्री. बळवंत शिवराम राणे | मुख्य कार्यवाह | श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे, |
| सह कार्यवाह | श्री. विवेक विष्णु केळकर | सह कार्यवाह | श्री. रघुनाथ रत्नोबा पाळेकर |
| कोषाध्यक्ष | श्री. संजय दत्ताराम टाकळे, | सह कोषाध्यक्ष | सौ. गीता श्रीकृष्ण सोवनी |
| संचालक सदस्य | श्री.पांडुरंग बाबला साळुंके | संचालक सदस्य | श्री.अरविंद मनोहर ठाकूरदेसाई |
| संचालक सदस्य | श्री.बाळकृष्ण रामचंद्र पाळेकर | संचालक सदस्य | श्री. चंद्रकांत रामचंद्र घाडी |

## सल्लागार समिती

| | | |
|---|---|---|
| श्री. रमेश अच्युत घाटे | श्री. अच्युत अर्जुन राणे | श्री. मोरेश्वर अनंत गोखले |
| श्री. शिवाजी कृष्णा राणे | श्री. राजेश शांताराम राणे | श्री. विजय महादेव पांगम |
| श्री. किशोर शंकर प्रभू | श्री. रमेश रामचंद्र भिडे | ॲडव्होकेट श्री. रुपेश राणे |

## स्थानिक समिति मुटाट

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेश दत्ताराम पाळेकर | श्री. रविंद्र भिकाजी प्रभू | श्री. हरिश्चंद्र मधुकर परब |
| श्री. प्रमोद महादेव चव्हाण | सौ. स्मिता अजय मराठे | श्री. शकील लतीफ मुल्ला |
| श्री. विठोबा शंकर प्रभू | श्री. सिताराम कृष्णा प्रभू | श्री. रघुवीर श्रीराम लेले |
| श्री. यशवंत वामन पाळेकर | सौ. मितल मंगेश पाळेकर | श्री. नाऊ सिधू खरात |
| श्री. काशिराम कुशा घाडी | श्री. लक्ष्मण राजाराम पाळेकर | श्री. किरण हरी प्रभू |
| श्री. अमित केशव साळुंके | डॉ. विनय विष्णू केळकर. | श्री. संजय सदाशिव पाळेकर |
| सौ. संजना शशिकांत प्रभू | | |

## स्थानिक समिति मणचे

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल दिनकर धाक्रस | श्री. अलकेश एकनाथ गुरव | श्री. प्रदिप रामचंद्र फाळके |
| श्री. अरविंद भिकाजी घाडी | सौ. सारिका मनेश रहाटे | श्री. सादिक अब्दुल्ला पावसकर |
| श्री. विजय राम देवळेकर | श्री. अजित मधुकर कानेटकर | श्री. गोपिचंद परशुराम कदम |
| श्री. सतीश मोरेश्वर गोखले | | |

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग**

## <u>६२ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची सूचना</u>

सूचना देण्यात येते की, मंडळाच्या सर्व सभासदांची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ठीक ०४. ०० वाजता, दादर येथे, छबिलदास मुलांच्या शाळेतील (CBSE) एका वर्गखोलीत, वाचनालय मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई, 400028, येथे खाली नमूद केलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर हजर राहावे ही विनंती.

### <u>सभेपुढील कामे</u>

१. तारीख ३० सप्टेंबर २०२३ रोजी मुटाट येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २०२३-२४ या वर्षाचे मंडळाचे आय-व्यय तसेच तारीख ३१ मार्च २०२४ रोजीचा मंडळाचा ताळेबंद, हायस्कूलचे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२३-२४ या वर्षाचे जमाखर्च मंजूर करणे. तसेच लेखापरीक्षकांनी दिलेल्या अहवालाचे वाचन करुन त्यात नमूद केलेल्या सुचना-त्रुटींवर चर्चा करुन निर्णय घेणे.
३. सन २०२३-२४ या वर्षाचा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा आणि मंडळाचा छापिल अहवाल मंजूर करणे.
४. सन २०२४-२५ या वर्षाकरिता हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांची फी व मानधन ठरविणे.
५. सन २०२४-२५ या वर्षाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास विचारविनिमयानंतर मंजूरी देणे.
६. डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल इमारतीचे नुतनीकरण, कनिष्ठ महाविद्यालय इमारत दुरुस्ती आणि कै.भाऊसाहेब काळे भागशाळा इमारतींच्या दुरुस्तीबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
७. अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता**

मुंबई/मुटाट
तारीख : ०१.०९.२०२४

सही-सुभाषचंद्र गणेश परांजपे
मुख्य कार्यवाह

**विशेष सूचना:** गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास अशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठीक ०४.३० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**टीप:** हिशेबाबाबत सर्वसाधारण सभेत काही खुलासा पाहिजे असल्यास तशी लेखी विचारणा मंडळाच्या मुटाट आणि मुंबई कार्यालयात, दिनांक १५.०९. २०२४ पर्यंत करावी ही विनंती.

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

## ६२ वा वार्षिक अहवाल

## दिनांक १.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४

सभासद बंधु आणि भगिनींनो,
सविनय नमस्कार,

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचा तारीख १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या वर्षाचा बासष्ठावा कार्यअहवाल, मंडळाचे लेखापरीक्षण झालेले सन २०२३-२४ या वर्षाचे आयव्यय आणि ३१ मार्च २०२४ रोजीचा ताळेबंद तसेच डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२३-२४ चे जमाखर्च, कार्यकारी समितीच्यावतीने सभासदांच्या माहितीसाठी आणि वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यता-मंजूरीसाठी सादर करीत आहोत.

सन्माननीय सभासदांच्या माहितीसाठी आणि मंजूरीसाठी, मंडळाचा संक्षिप्त कार्य अहवाल, डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट या शैक्षणिक आस्थापनांचा, प्राचार्य/मुख्याध्यापक श्री दिलीप तुकाराम घरपणकर यांनी सादर केलेला सन २०२३-२४ या वर्षाचा संक्षिप्त कार्यवृत्तांत सादर केला आहे.

कार्यकारी समितीने वर्षभरात, ऑन लाईन सभां आणि प्रत्यक्ष सभांचे आयोजन करुन मंडळाचे कामकाज पार पाडले आणि हीरक महोत्सव समारोहाचे उत्कृष्टपणे सादरीकरण केले. महत्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करुन अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार केले आणि काटेकोर पालन करुन कार्यसिध्दीवर भर दिला. शैक्षणिक आस्थापनातील कामे, शैक्षणिक कामे, प्रशासकीय कामे, नियोजनपूर्वक व्हावीत यासाठी संतुलित नियोजनावर भर देण्यात आला. विहित मुदतीत सर्व कामे पार पडल्याने वार्षिक सर्व साधारण सभेचे मुदतीत आयोजित केली आहे.

दिवंगत सभासदांचे स्मरण: वृत्तांत काळात मंडळाचे आश्रयदाते, आजीव सभासद आणि अन्य हितचिंतक अशा निधन पावलेल्या ज्ञात आणि अज्ञात सभासदांचे स्मरण करुन, कार्यकारी समिती सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

### अहवाल काळात पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या विकास कामांची माहिती:

1. मुटाट आणि मणचे येथिल हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारतींमधील पावसाळी पाणीगळती थांबविण्यासाठी उभारलेल्या संरक्षक शेडची उर्वरीत कामे पावसाळ्यापूर्वी करण्यात आली.
2. मुटाट आणि मणचे येथिल हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारत, संकुल परिसराची साफसफाई, बागेची सफाई करण्यात आली.
3. डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुलात, सौर ऊर्जा वीज निर्मिती यंत्रणा (SOLAR SYSTEM) पूर्णपणे कार्यान्वित करण्यात आली असल्याने, डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय संकुलाची पूर्ण वीज गरज भागत आहे.

**नवीन सभासद:** धर्मादाय आयुक्त कार्यालय संबंधातील सर्व मंजूरीनंतर नवीन सभासद करण्याचे काम सुरु होईल.

**अर्थसंचय:**

वृत्तांत वर्षामध्ये मंडळाचे विविध शैक्षणिक उपक्रम, पारितोषिके आणि शिष्यवृत्त्यां, डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयामधील विकास कामांसाठी तसेच अन्य विधायक सुविधांसाठी ३१ मार्च २०२४ पर्यंत अनेक दानशूर व्यक्तींकडून आणि संस्थांकडून मंडळास देणग्यांद्वारे आर्थिक सहाय्य मिळाले. आम्ही त्या सर्व दात्यांचे आभारी आहोत. वर्षभरात एकूण रुपये 83,000 देणगी रुपात मिळाले.

**अन्य उत्पन्न:**

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलच्या आवारातील हापूस आंब्यांच्या विक्रीतून रुपये 15,175 चे उत्पन्न मंडळास मिळाले.

## खर्चाच्या बाबी:

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै. भाऊसाहेब काळे भागशाळा आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, कला-क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व, व्यक्तिमत्व विकास, विविध स्पर्धा परीक्षा, विविध प्रदर्शने यातील गुणवत्तापूर्ण यशप्राप्तीसाठी गुणगौरव पारितोषिके तसेच हुशार आणि गरजू विध्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या प्रदान करण्यासाठी सन्माननीय देणगीदारांनी मंडळास देणग्या दिल्या आहेत. या देणग्यांच्या गुंतवणुक व्याजातून अहवाल काळात वितरण केलेली पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या पुढीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १. कै.गणेश अनंत सोवनी शिष्यवृत्ती | रु.२५००.०० |
| २. कै.रामचंद्र विष्णु लेले व कै.सीताबाई रामचंद्र लेले शिष्यवृत्ती | रु. ५५०.०० |
| ३. श्री.शंकर गोविंद लेले व सौ.सुमती शंकर लेले शिष्यवृत्ती | रु. ५००.०० |
| ४. कै.सौ. शारदा कृष्णा राणे शिष्यवृत्ती | रु. ५००.०० |
| ५. कै.भिकाजी ऊर्फ दादा चिरपुटकर शिष्यवृत्ती | रु. ५००.०० |
| ६. कै.कृष्णा सिताराम राणे स्मृती शिष्यवृत्ती | रु.१,०००.०० |

वरील शिष्यवृत्त्यांसह सन २०२२-२३ मधील गुणवंत विध्यार्थ्यांना विविध विषयांतील वार्षिक परीक्षेतील उल्लेखनीय यश तसेच क्रीडा,वक्तृत्व व विविध स्पर्धात्मक परीक्षेतील उल्लेखनीय यश प्राप्तीबद्दल दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभांत रोख रकमेची पारितोषिके वितरीत करण्यात आली.

## शिक्षणसेवक आणि संगणक शिक्षणासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या मानधनाचा खर्च:

मंडळाने सन २०२३-२४ वर्षामध्ये नियुक्त केलेल्या शिक्षणसेवकांच्या तसेच संगणक आय.सी.टी.निर्देशकाच्या संपूर्ण मानधनाचा खर्च सुमारे 6,57,000/- रुपये मंडळाने देणगीरुपात अर्थसहाय्य मिळवून केला.

शैक्षणिक उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी होणारा खर्च वाढता असून तो भागविण्यासाठी कार्यकारी समितीने सामान्य (कायमस्वरुपी) निधी आणि शैक्षणिक निधी उभारण्यास सुरुवात केली आहे. सन्माननीय देणगीदारांनी आणि सर्व सभासद बंधु-भगिनीं यांनी, सामान्य व शैक्षणिक निधीसाठी त्याचप्रमाणे हायस्कूल, भागशाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारतींची देखभाल, आणि दुरुस्तीसाठी देणग्या द्याव्यात तसेच आप्तजनांकडून देणग्यां मिळवाव्यात असे नम्र आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

**पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन २०२३-२४:** शुक्रवार दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. मंडळाचे अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे मा. डॉ. शरद शेटे, उपप्राचार्य, श्रीमती न.शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय, देवगड, सन्माननीय पाहुणे म्हणून मा. श्री. राजीव मधुकर तायशेटे, M.Arch., उद्योजक आणि प्रगतीशील शेतकरी व मा. ॲडव्होकेट प्रभाकर राजाराम पेंढारकर, M.A.LLB. यांची उपस्थिती लाभली होती. सल्लागार श्री. विजय पांगम, उपाध्यक्ष श्री. धनंजय परांजपे, मुख्य कार्यवाह श्री. सुभाषचंद्र परांजपे, कार्योपाध्यक्ष श्री. जितेंद्र साळुंके, कोषाध्यक्ष श्री. संजय टाकळे, सहकोषाध्यक्षा सौ. गीता सोवनी, सहकार्यवाह श्री. रघुनाथ पाळेकर, सभासद श्री. अरविंद ठाकुरदेसाई, सभासद श्री. बाळकृष्ण पाळेकर, सभासद श्री. चंद्रकांत घाडी, डॉ. दिलिप पाळेकर, डॉ. विनय केळकर आणि सर्व स्थानिक समिती सदस्य उपस्थित होते. पारितोषिक वितरण समारंभ गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत आणि इतर विध्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आनंदात पार पडला.

शनिवार दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै.भाऊसाहेब काळे भागशाळेसह आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंम्मेलन विविध गुणदर्शनाच्या सुंदर सादरीकरणाने पार पडले.

**कार्यकारी समितीच्या सभा:** वृत्तांत वर्षांमध्ये कार्यकारी समितीच्या १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत कार्यकारी समितीच्या एकूण ५ सभां पार पडल्या. या सभांना सरासरी ७५ टक्के इतकी उपस्थिती होती. कार्यकारी समितीच्या प्रत्येक सभेमध्ये मंडळाच्या अंगिकृत उपक्रमांच्या कामकाजावर समग्र चर्चा होऊन विनिमयानंतर विषयवार निर्णय सर्व संमतीने घेण्यात आले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :** मंडळाच्या सर्व सभासदांची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी ठीक ०२.३० वाजता डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट, ता.देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, ४१६८०३, येथे खाली नमूद केलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात आली होती. सभेस मंडळाचे एकूण २५ सभासद हजर होते.

सभेचे अध्यक्षस्थान, अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर यानी भूषविले. वार्षिक सर्वसाधारण सभेस दुपारी ठीक ०२.३० वाजता पुरेशी गणसंख्या नसल्याने सभा अर्धा तास तहकुब करण्यात आली. त्यानंतर त्याच ठिकाणी, ठीक ०३.०० वाजता सभेला सुरुवात झाली.

सभेच्या सुरुवातीला, सभेला उपस्थित असलेल्या सर्व सभासदांच्यावतीने मंडळाच्या ज्ञात आणि अज्ञात दिवंगत सभासदांसह दिवंगत झालेल्या हितचिंतकांचे स्मरण करुन सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

सह कार्यवाह श्री. रघुनाथ पाळेकर यांनी ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेचे वाचन केले.

कोषाध्यक्ष श्री. संजय दत्ताराम टाकळे यांनी तारीख २४ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. अध्यक्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या मंजूरीसाठी सभेत विचारणा केली. उपस्थित सदस्यांनी सर्वानुमताने इतिवृत्तास मान्यता दिल्याने सभेने मंजुरीचा ठराव पारित करण्यात आला.

सन २०२२-२३ या वर्षाचे मंडळाचे आयव्यय तसेच तारीख ३१ मार्च २०२३ रोजीचा मंडळाचा ताळेबंद, हायस्कूलचे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२२-२३ या वर्षाचे जमाखर्च सभेच्या मंजुरीसाठी पटावर ठेवण्यात आले. जमाखर्च लेखापरीक्षणाच्या संदर्भात तसेच अन्य काही बाबींविषयी माहिती हवी असल्यास मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. संजय टाकळे यांनी सभेत विचारणा केली आणि स्पष्टीकरणात्मक निवेदन केले. मंडळाच्या सभासदांच्या मागणीनुसार या वर्षीचे जमाखर्च व ताळेबंद यांची छपाई मराठीतून करण्यात आली आहे यावर त्यांनी भर दिला.

या विषयांतर्गत महत्वाच्या सर्व बाबींची पूर्तता होऊन सभासदांचे समाधान झाल्याने सन २०२२-२३ या वर्षाचे मंडळाचे आयव्यय तसेच तारीख ३१ मार्च २०२३ रोजीचा मंडळाचा ताळेबंद, हायस्कूलचे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२२-२३ या वर्षाचे जमाखर्च यांस सभेने ठराव मंजूर करुन मान्यता दिली.

कोषाध्यक्षांनी निवेदन केले की, लेखापरीक्षक श्री. सुधाकर परांजपे यांच्याशी विचार विनिमय करुन जमाखर्चातील दुर्बोधता कमी करण्याची सर्व प्रक्रीया पूर्ण होत आली आहे. स्थावर मालमत्ता आणि अन्य बाबींची लेखापरीक्षकांच्या सल्ल्यानुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे. जमाखर्च तपशील सुलभ करण्यात येत असून जमाखर्चातील दुर्बोधता कमी होत आहे. अनावश्यक उपखाती आणि खाती नियमीत, कायमस्वरुपी खात्यांत वर्ग करण्यात येत आहेत. जी काही कलमे बाकी आहेत त्यांचे वर्गीकरण लेखापरीक्षकांच्या सल्ल्याने करण्यात येणार आहे. सभासदांचे स्पष्टीकरणाने समाधान झाल्याने, पुढील विषय विचारार्थ घेण्यात आला.

कोषाध्यक्ष यांनी विषयाचे सविस्तर विवेचन केले. श्री. धनंजय परांजपे यांनी उपयुक्त खुलासा केला. लेखातपशील सुटसुटीत करुन खाती वर्गिकरणास कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार लेखापरीक्षकांच्या सल्ल्याने योग्य ती पुनर्रचना करावी असे सर्वानुमते ठरल्याने तसा ठराव मांडण्यात आला व तो मंजूर झाला.

त्यानंतर मंडळ अहवाल आणि हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा अहवाल सर्व सभासदांना आगाऊ पोच करण्यात आलेला असल्याने सर्व बाबींची पूर्तता होऊन सभासदांचे समाधान झाल्याने सन २०२२-२३ या वर्षाच्या छापील अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सन २०२३-२४ या वर्षाकरिता हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांची फी व मानधन ठरविणे, या विषयासंदर्भात सभेत चर्चा झाली. सभेस उपस्थित सभासदांचे मत पडले की, मंडळाचे सनदी लेखापरीक्षक म्हणून मे . परांजपे अँड असोसिएट्स चे श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊंटंट यांची सन २०२३-२४ या वर्षाकरिता हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळाचे लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करावी आणि नियमानुसार देय मानधन कार्यकारी समितीने ठरवावे. सर्वांची एकवाक्यता झाल्याने तसा ठराव मंजूर करण्यात आला.

कोषाध्यक्षांनी सन २०२३-२४ या वर्षाचे हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळाचे वार्षिक उलाढाल आणि वाढीव खर्चाची तरतूद असलेल्या रुपये २३,८२,०००/- चे अंदाजपत्रक विवेचनासह सादर केले. सर्वांचे समाधान झाल्याने सभेने अंदाजपत्रकास मंजूरी दिली.

**<u>मंडळाच्या आगामी शैक्षणिक उद्दिष्टांबाबत चर्चा करुन सर्वसंमतीने कृती पूरक निर्णय घेणे.</u>** या विषयावर व्यापक चर्चा करण्यात आली. श्री. सुर्यकांत साळुंके, श्री. विजय पांगम, विश्वस्त श्री काशिनाथ पाळेकर सौ. गीता सोवनी, श्री संजय टाकळे, श्री. जितेंद्र साळुंके, श्री. रघुनाथ पाळेकर यांनी पुढीलप्रमाणे महत्वाचे मुद्दे मांडले.
पुढील शैक्षणिक वर्षापासून फळ प्रक्रियेसंबंधीत शैक्षणिक कोर्सेस सुरु करण्यासाठी पाहाणी करण्यात यावी.
संस्थेने शिवणकाम, प्लंबिंग (नळ जोडणी, दुरुस्ती) इलेक्ट्रीक दुरुस्ती, सुतारकाम असे रोजगारक्षम अभ्यासक्रम सुरू करावेत.
मोबाईल, रिक्षा, मोटरसायकल, मोटरगाडी दुरुस्तीसंबंधीत प्रात्यक्षिकासह अभ्यासक्रम सुरु करावेत.
मंडळाने ज्युनियर कॉलेज सुरु केले आहे. पुरेशी विध्यार्थी संख्या असल्यास पदवीपर्यंत कॉलेज सुरु करावे.
प्राथमिक शिक्षण हायस्कूलला जोडल्यास शैक्षणिक प्रगती साध्य होऊ शकेल संस्था दर्जेदार शिक्षण देऊ शकेल.
आजूबाजूच्या गावातील परिस्थिती बघून संस्थेने काही व्यवसायपूरक कोर्सेस सुरू करायला हवेत.
इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचा संस्थेने विचार करावा.

वरील उपयुक्त चर्चा आणि प्रस्ताव कार्यवाहीसंबंधातील साधक बाधक आघाड्यांवर परीक्षण करुन कार्यवाही अहवाल तयार करावा असे सर्वानुमते ठरले.

अध्यक्षांनी शालेय परिसर, वर्ग खोल्या, संकुल परिसर आकर्षक करून आधुनिकता आणायची गरज असल्याचे सभासदांच्या निदशर्नास आणले. तसेच उत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी आपल्या शाळेत आहे पण विद्यार्थी संख्या नैसर्गिक रित्या कमी होत असल्याने विद्यार्थी संख्येअभावी संस्थेवरचा आर्थिक भार वाढत आहे याची दखल घ्यावी लागत असल्याचे सभेत निवेदन केले.

अध्यक्षांच्या परवानगीने मंडळाच्या ध्येय आणि धोरणांशी संबंधीत महत्वाच्या विषयांवर सुचना आणि म्हणणे मांडण्याची सभासदांना परवानगी देण्यात आली. सभेत विषयपत्रिकेनुसार सर्व विषयांवर माहितीपूर्ण चर्चा झाल्याने कोणताही महत्पूर्ण विषय चर्चा आणि विचारविनिमयासाठी सभेपुढे आला नाही.

सभेला उपस्थित असलेल्या सभासदांचे श्री.संजय टाकळे कोषाध्यक्ष आणि श्री. सूर्यकांत साळुंखे यांनी आभार मानले.आभारप्रदर्शनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर सभेची सांगता झाली.

**आभार प्रदर्शन:**

अहवालाचे अखेरीस मंडळाचे सर्व सभासद, हितचिंतक, आजी-माजी विद्यार्थी, मुटाट, मणचे, पाळेकरवाडी, वाघोटण, सडेवाघोटण या पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालकवर्ग, डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट, कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय मुटाट, डॉ. श्री.र.लेले हायस्कूलची कै.भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे या शैक्षणिक संस्थांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

मंडळाचे लेखापरीक्षक श्री. सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाउंटंट, विश्वस्त श्री. अनंत श्रीधर लेले, डॉ. दिलीप केशव राणे आणि श्री. काशिनाथ रत्नोबा पाळेकर यांचेही नम्रतापूर्वक आभार.

डॉ. श्री.र.लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय परिसर तसेच कै. भाऊसाहेब काळे भागशाळा येथिल अनेक विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणाऱ्या सर्व ट्रस्टचे, सन्माननीय देणगीदारांचे आणि माजी विद्यार्थ्यांचे नम्रतापूर्वक आभार.

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत सल्लगार समिती, मुटाट व मणचे स्थानिक समिती, शाळा समिती आणि शिक्षक पालक संघ, डॉ. श्री.र.लेले हायस्कूल माजी विध्यार्थी संघ या समित्यांतील सर्व सदस्यांचे नम्रतापूर्वक आभार.

अखेरीस, मंडळाच्या संचालन कार्यात, महत्वाचा वाटा उचलणारे, आमचे मुंबई, मुटाट आणि मणचे येथिल पदाधिकारी आणि सदस्य तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्व आदरणीय व्यक्तींचे आणि संस्थांचे नम्रतापूर्वक आभार मानून, भावी काळात विध्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, व्यक्तिमत्व विकास आणि कौशल्य विकासास पूरक सुविधा निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न राहील याची सर्व सभासदांना ग्वाही देत, अहवालाची समाप्ती करतो.

**आपले कृपाभिलाषी**

## मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विश्वासराव रामचंद्र पाळेकर<br>अध्यक्ष | श्री. विनायक कृष्णाजी लेले<br>कार्याध्यक्ष | श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे<br>मुख्य कार्यवाह | श्री. संजय दत्ताराम टाकळे<br>कोषाध्यक्ष |

**विचाराधिन सुधारीत घटना दुरुस्ती आणि नियमांनुसार प्रस्तावित बदल:**

**मंडळाचे उद्देश:**

१. सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्याच्या मुटाट व आसपासच्या भागांतील मुलामुलींच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयी पुरविणे.

२. त्याच भागांतील मुलामुलींसाठी कला, शास्त्र, वाणिज्य,अभियांत्रिकी, कृषिविषयक आणि महाविध्यालयीन शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे.

३. विविध अभ्यासक्रमातील पदविका सुरु करुन व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी पदविका वर्ग सुरु करणे.

४. शाळा आणि महाविद्यालयातील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा आणि व्यावसायिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविणे आणि उपयुक्त कार्यशाळांचे आयोजन करणे.

५. ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन देणारे उपक्रम सुरु करुन विद्यार्थ्यांना मोबदला देणारे व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

**सभासद वर्गणी:**

- आधारस्तंभ: रु. २५०००/-
- आश्रयदाते: रु. १००००/-
- हितचिंतक: रु. ५०००/-
- आजीव सभासद: रु. ५००/-

**सन्मान्य सभासद:** मंडळाच्या कार्याला चालना देणाऱ्या व विशेष कार्यामुळे मंडळाच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या व्यक्तींना सन्मान्य सभासदत्व देण्याचा अधिकार कार्यकारी समितीला आहे.

- **बँकर्स**

- आयडीबीआय बँक – दादर
- स्टेट बँक ऑफ इंडिया – देवगड
- बँक ऑफ महाराष्ट्र- जामसंडे
- विदर्भ कोकण ग्रामीण बँक – मुटाट
- सिंधुदुर्ग जिल्हा म.सह.बँक- मणचे

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित: डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट, कै.भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट,ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग**

## वार्षिक कार्य - अहवाल: शैक्षणिक वर्ष 2023-24:

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ तसेच पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ विद्यार्थी व शाळेतील कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे शाळेच्या विकासात्मक कार्यात मोलाची भर घालता आली. या सर्वांचा मी आभारी आहे तसेच सर्वांना खूप खूप धन्यवाद देतो .

शैक्षणिक वर्ष 2023 24 मध्ये डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट मध्ये एकूण 194 विद्यार्थी, कै. भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे मध्ये एकूण 97 विद्यार्थी आणि कै सौ जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य संयुक्त कनिष्ठ महाविद्यालय मुटाट मध्ये 80 विद्यार्थी मिळून एकूण 371 विद्यार्थी शिक्षण घेत होते .

- **एस. एस. सी. मार्च 2024 निकाल** :

मार्च 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस ( दहावी ) डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट मधून एकूण 59 विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी 58 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल 98.31 टक्के लागला. तसेच कै. भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे मधून एकूण 42 विद्यार्थी प्रविष्ट होऊन सर्वच्या सर्व 42 उत्तीर्ण झाले. निकाल शंभर टक्के लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी : प्रथम - राजरत्न अनिल साळुंके 87.20% (बौद्धवाडी मुटाट )<br>
द्वितीय - कौस्तुभ प्रकाश जोशी 88.60% (सडेवाघोटण )<br>
तृतीय - कु. मंजुळा आनंद खरात 86.00% ( रेडे टाका )

- **एच. एस. सी. फेब्रुवारी /मार्च 2024 परीक्षा निकाल :**

फेब्रुवारी- मार्च 2024 मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी कै सौ जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य संयुक्त कनिष्ठ महाविद्यालयातून 49 विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल शंभर टक्के लागला.

कला शाखा 20 विद्यार्थी – 100 %<br>
गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी : प्रथम – कु. भाग्यश्री विजय शिर्के 58.50% (मुटाट )<br>
द्वितीय - शुभम दीपक बाणे 57.17% (मुटाट )<br>
तृतीय – कु. कोमल विकास परब 55.83% (वाघोटण )

वाणिज्य शाखा - प्रविष्ट विद्यार्थी 30 - निकाल 100%<br>
गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी : प्रथम – कु. साळुंके श्रेया अनिल 76.00% (मुटाट )<br>
द्वितीय - कु. रागिनी दिलीप गाडी 74.17% (मुटाट )<br>
तृतीय - क. पूर्वा सुनील भेकरे 71.00% (मुटाट )

- **शिष्यवृत्ती परीक्षा**

इयत्ता पाचवी मधून 3 व इयत्ता आठवी मधून 9 विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले परंतु कोणालाही विशेष यश मिळवता आले नाही .

- **एन. एम. एम. एस. परीक्षा**

आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी असणाऱ्या या परीक्षेला इयत्ता आठवी मधून एकूण 19 विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी दोन मुलींना यश प्राप्त झाले . पैकी एका विद्यार्थ्याची ( सार्थक चंद्रकांत प्रभू ) याची सारथी शिष्यवृत्तीसाठी निवड झाली त्याला जवळपास 40 हजार रुपये शिष्यवृत्ती पुढील चार वर्षात मिळेल.

- **चित्रकला परीक्षा**

सन 2023-24 मध्ये एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेला मुले प्रविष्ट झाली. परीक्षेचा निकाल 100 % लागला .

- **रंगभरण स्पर्धा**

माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ देवगड तालुक्याच्या वतीने 15 ऑगस्ट च्या निमित्ताने रंगभरण स्पर्धा आयोजित केली होती विद्यालयातून दोनशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शाळा स्तरावरील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

❖ **बाल चित्रकला स्पर्धा**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने 2023-24 या वर्षात बालचित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुकास्तरावर कनिष्ठ गटामध्ये व वरिष्ठ गटांमध्ये आपल्या शाळेतील अनुक्रमे सार्थक अभय साळसकर व निखिल नंदकुमार मेस्त्री यांना यश प्राप्त झाले त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळाले .

❖ **राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड**

जिल्हा खो-खो असोसिएशन मार्फत राज्यस्तरावर खेळण्यासाठी शाळेतील दोन मुलींची कु. गायत्री लक्ष्मण घाडी व कु. वैष्णवी महेश पुजारे यांची निवड झाली. त्या पालघर येथे राज्यस्तरावर खेळून आल्या.

❖ **योग दिन**

21 जून आंतरराष्ट्रीय योग दिन नेहमीप्रमाणे शाळेत साजरा करण्यात आला. श्री बन्सी तारी, श्री नारायण आत्माराम पाळेकर , श्री कृष्णा विष्णू पाळेकर व श्री शामसुंदर गणपत पाळेकर यांनी मुलांना योग्य प्रात्यक्षिके दाखविली. योगाचे फायदे सांगून मार्गदर्शन केले .

❖ **सरस्वती पूजन**

शैक्षणिक वर्ष 2023 - 24 मध्ये उत्साही वातावरणात सरस्वती पुजनाचा कार्यक्रम पार पडला. मुलांनी गरबा नृत्याचा आनंद लुटला .

❖ **इयत्ता अकरावी स्वागत समारंभ**

दरवर्षीप्रमाणे इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या मुला मुलींच्या स्वागताचा समारंभ घेण्यात आला. इयत्ता 12 वीतील विद्यार्थी इयत्ता अकरावी मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे अगदी दिमाखात स्वागत करतात. यावर्षी देखील हा समारंभ आनंदमय वातावरणात साजरा झाला.

❖ **सायबर गुन्हेगारी जागृती कार्यक्रम**

शैक्षणिक वर्ष 2023 - 24 मध्ये विजयदुर्ग पोलीस स्टेशन मार्फत हा समारंभ घेण्यात आला. विजयदुर्ग पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक व श्रावणी कॉम्प्युटर्स तळेरे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हेगारी बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले प्रत्यक्ष व्हिडिओ क्लिप च्या माध्यमातून प्रत्यक्ष गुन्हेगारी कशी घडते यावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले व त्यानंतर यावर आधारित एक परीक्षा घेण्यात आले या परीक्षेमध्ये विभागात आपल्या शाळेच्या विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला तिला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

❖ **वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे बाबत**

ज्ञानप्रबोधिनी संस्था देवगड यांचे मार्फत वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा यासाठी जिल्हास्तरावर दोन विद्यार्थ्यांची निवड झाली यामध्ये कु. लीना विश्वास पाळेकर व देवांग सुधाकर परांजपे यांना जिल्हास्तरावर अधिवेशनात सहभाग मिळाला दोन दिवसीय अधिवेशन पार पडले तसेच देवांग सुधाकर परांजपे याची विभागीय स्तरासाठी निवड होऊन पुणे येथे तीन दिवसांचे मार्गदर्शन शिबीर पार पडले .

❖ **अध्ययन संस्था कोळोशी मुंबई अध्ययन संस्था मुंबई**

सदर संस्था कणकवली - देवगड तालुक्यांमध्ये शालेय सुधार उपक्रमांतर्गत गणित व विज्ञान विषयाचे मार्गदर्शन करत असते 2023 24 मध्ये या संस्थेमार्फत अनुसंरचना ऑलिंपिक स्पर्धा मार्गदर्शनासह घेण्यात आले. त्यामध्ये आपल्या शाळेचा वरिष्ठ गटातील कु. लीना विश्वास पाळेकर व देवांग सुधाकर परांजपे यांना तालुकास्तरीय द्वितीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले तसेच गणित सुधार उपक्रमांतर्गत अपूर्णांक ऑलिंपिक स्पर्धा घेण्यात आली. शाळेच्या कनिष्ठ गटातील दोन विद्यार्थ्यांना तालुकास्तरीय द्वितीय क्रमांक मिळाला .

❖ **शासकीय क्रीडा स्पर्धा**

शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या या क्रीडा स्पर्धांमध्ये शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला यापैकी अनेक मुलांनी आपले कौशल्य सिद्ध करून प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले जवळपास सर्वच क्रीडा प्रकारात मुलांचा सहभाग होता.

- **मैदानी स्पर्धा**

14 वर्षाखालील एकूण 22 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच 17 वर्षाखालील 69 विद्यार्थी व 19 वर्षाखाली एकूण 22 विद्यार्थी मिळून तालुकास्तरावर एकूण 61 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पैकी 27 विद्यार्थ्यांनी तालुकास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून जिल्हास्तरावर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले.

तालुकास्तर प्राविण्य –

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|
| 1 | कु. सानिया विलास पाळेकर | 100 मी. धावणे द्वितीय क्रमांक |
| | | थाळीफेक द्वितीय क्रमांक |
| | | भालाफेक प्रथम क्रमांक |
| | | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| 2 | कु. योगिता अनिल परब | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| 3 | कु. हर्षाली अनिल परब | 100 मी. धावणे द्वितीय क्रमांक |
| | | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| | | थाळीफेक प्रथम क्रमांक |
| 4 | लौकीक बाबल्या भेकरे | 100 मी धावणे द्वितीय क्रमांक |
| 5 | कु. सुकन्या लवू देवळेकर | 400 मी धावणे प्रथम क्रमांक |
| | | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| 6 | दर्पण विजय ढवळे | थाळीफेक द्वितीय क्रमांक |
| 7 | तन्मय संदेश घाडी | ऊंचउडी प्रथम क्रमांक |
| 8 | कु. जानवी विलास लाखण | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| 9 | कु. रुचिता संदीप पाळेकर | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| 10 | चेतन राजेंद्र प्रभू | थाळीफेक प्रथम क्रमांक |
| 11 | कु. गायत्री लक्ष्मण घाडी | थाळीफेक द्वितीय क्रमांक |
| 12 | करण रविंद्र परब | 1500 मी धावणे प्रथम क्रमांक |
| 13 | कु. सिद्धी रविंद्र नाटेकर | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| | | 200 मी धावणे द्वितीय क्रमांक |
| 14 | कु. रसिका राजेंद्र तांबे | थाळीफेक द्वितीय क्रमांक |
| 15 | कु. कोमल विकास परब | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |
| 16 | कु. कृषांगी सुरेश तिर्लोटकर | रिले 4 x 100 प्रथम क्रमांक |

- **सांघिक स्पर्धा खो-खो**

शाळेचे U14, U17 व U19 वर्षाखालील मुलींच्या व मुलांच्या खो-खो च्या सहा संघांनी आपला सहभाग दिला. त्यापैकी तीन संघ तालुकास्तरावर प्रथम येऊन जिल्हास्तरासाठी पात्र ठरले. जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत 14 वर्षाखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तर अजिंक्यपद पटकावले व विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले विभागीय स्तरावरील स्पर्धा सन 2023 - 24 मध्ये इचलकरंजी येथे पार पडली. या स्पर्धेत आमच्या शाळेच्या 14 वर्षाखालील संघाने जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले या स्पर्धेत सांगली जिल्हा संघासोबत अटीतटीची लढत दिली .

19 वर्षाखालील खो-खोचा मुलींचा संघ जिल्हास्तरावर उपविजेता ठरला.

- **विज्ञान प्रदर्शन :** शैक्षणिक वर्ष 2023 24 मध्ये 50 वे विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रतिकृतीसह आपला सहभाग नोंदविला.
- **जयंती व पुण्यतिथी उत्सव:**

शाळेत दरवर्षी महनीय अशा व्यक्तींच्या जयंती व पुण्यतिथीचे उत्सव साजरे केले जातात याही वर्षी सर्व उत्सव साजरी करण्यात आले. आपल्या शाळेचे आद्य संस्थापक डॉ. श्रीधर रघुनाथ लेले यांच्या जयंतीच्या उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. 1 मार्च 2024 या जयंती कार्यक्रमाला पंचक्रोशीतील अनेक व्यक्तींनी आपली उपस्थिती दर्शविली. डॉ हेमलता पुरंदरे मॅडम यांनी मुलांसाठी लाडूचे वाटप केले.

अशा पद्धतीने शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा व कार्यक्रम घेऊन मुलांचा शैक्षणिक, शारीरिक व मानसिक विकास साधण्याचे काम नेहमीच करत आलो आहोत आणि यापुढेही करत राहू. या शैक्षणिक वर्षांमध्ये मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, पालक- शिक्षक संघ, माता पालक संघ, शिक्षण विभाग, परिवहन विभाग , आरोग्य विभाग , संरक्षण विभाग, पंचक्रोशीतील सर्व ग्रामपंचायती ,ग्रामस्थ, कर्मचारी व विद्यार्थी यांनी खूप मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचे शाळेच्या वतीने ऋण व्यक्त करून शाळेच्या वाटचालीतील सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींना धन्यवाद देतो .

**श्री दिलीप तुकाराम घरपणकर**

मुख्याध्यापक/प्राचार्य

**डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट**



मंडळाचे सल्लागार श्री. रमेश रामचंद्र भिडे, 26 जानेवारी 2024 ला झेंडा वंदन करुन विध्यार्थ्यांशी संवाद साधतांना..



उपाध्यक्ष श्री. धनंजय परांजपे, पारितोषिक वितरण समारंभात गुणवंत विध्यार्थ्यास पारितोषिक देतांना..



कार्योपाध्यक्ष श्री. जितेंद्र साळुंके यांनी त्यांचे दिवंगत वडील कै. मोतीराम विठ्ठल साळुंके यांच्या स्मरणार्थ मुटाटच्या वेशीवर माहितीपूर्ण आणि भव्य प्रवेशद्वार उभारले..



प्रमुख पाहुणे मा. डॉ. शरद शेटे, उपप्राचार्य, श्रीमती न.शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय, देवगड, गुणवंत विध्यार्थ्यास पारितोषिक देतांना..



डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट

**रक्षाबंधन उत्सव**




कै. भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे

**स्वातंत्र्य दिन समारोह**



स्वातंत्र्य दिन झेंडावंदन



सौर वीजनिर्मिती पॅनल




**कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय आणि श्रीमती सूलोचना पंढरीनाथ आरावकर स्मृती रंगमंच**



# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

31 मार्च 2024 रोजीचे ताळेबंद पत्रक

| **निधी व देणी** | **2023-24**<br>**रु. पै.** | **मालमत्ता व येणी** | **2023-24**<br>**रु. पै.** |
|---|---|---|---|
| **संस्था निधी सामान्य निधी**<br>(As per Schedule K) | 2207268.97 | **स्थावर मालमत्ता जमीन,इमारत वगैरे**<br>(As per Schedule D) | 8342815.85 |
| **अन्य वर्गीकृत निधी**<br>(As per Schedule L) | 17442037.00 | **जंगम मालमत्ता**<br>(As per Schedule E) | 2399221.15 |
| **घसारा निधी**<br>(As per Schedule D E) | 3613417.37 | **गुंतवणुका** | 0 |
| | | **जमा येणी आणि देणी**<br>(As per Schedule N) | |
| **देणी**<br>(As per Schedule M) | 199861.00 | | 235002.20 |
| | | **रोख व बँक – शिल्लक**<br>(As per Schedule O) | |
| **उत्पन्न-खर्च खात्याचा निष्कर्ष** | | **उत्पन्न- खर्च खात्याचा निष्कर्ष** | 12069822.73 |
| | | मागील ताळेबंदाप्रमाणे -31873.56<br>आयव्यय खात्यातील तूट 447595.97 | 415722.41 |
| **एकूण** | **23462584.34** | **एकूण** | **23462584.34** |

मुंबई- ता. **मे.परांजपे अँड असोशिएटस** **मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता**

सही/- भागीदार श्री. सुधाकर जयंत परांजपे,
चार्टर्ड अकाऊटंट

सही/- सं. द. टाकळे
कोषाध्यक्ष

सही/- वि.रा.पाळेकर
अध्यक्ष

## मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षांचा उत्पन्न व खर्च खात्याचा सारांश

| खर्च | 2023-24<br>रु. पै. | उत्पन्न | 2023-24<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| **मालमत्तेविषयी खर्च**<br>**(As per Schedule A)** | 30659.00 | **इमारत भाडे** | 24588.00 |
| | | **बँक व्याज**<br>**(As per Schedule F)** | 611048.79 |
| **आस्थापन खर्च**<br>**(As per Schedule B)** | 101706.77 | | |
| | | **देणग्या**<br>**(As per Schedule B)** | 484085.00 |
| **आयव्यय निरीक्षकांची बिदागी अंशदान आणि फी** | 11000.00 | | |
| | | **सरकारी अनुदाने**<br>**वेतन व वेतनेतर**<br>**(As per Schedule H)** | 16077321.00 |
| **घसारा**<br>**(As per Schedule D & E)** | 301387.00 | | |
| | | **अन्य मार्गाने जमा**<br>**(As per Schedule I)** | 15467.00 |
| **उद्देश्यांप्रित्यर्थ खर्च (शैक्षणिक)**<br>**(As per Schedule C)** | 16768559.20 | | |
| | | **फी टर्म फी व अन्य फी**<br>**(As per Schedule J)** | 21950.00 |
| **संस्था निधींकडे वर्ग केलेल्या रकमा** | 468743.79 | | |
| | | **तूट ताळेबंदाकडे वर्ग** | 447595.97 |
| **एकूण** | **17682055.76** | **एकूण** | **17682055.76** |

मुंबई- ता. **मे.परांजपे अँड असोशिएटस** **मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता**

सही/- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे,
चार्टर्ड अकाऊटंट

सही/- सं,द,टाकळे वि.रा.पाळेकर
कोषाध्यक्ष अध्यक्ष

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलचा 01.04.2023 ते 31.03.2024 या वर्षांचा जमाखर्चाचा सारांश

| उत्पन्न | 2023-24<br>रु. पै. | खर्च | 2023-24<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक**<br>HEAD MASTER : 3545.50<br>SDCC BK KASARDE: 334500.32<br>SBI DEOGAD : 34607.99<br>VKGB BK MUTAT : 2666.30<br>SDCCBK MANCHE: 10042.00 | 385362.11 | **पगार**<br>शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी:<br>लेखनिक<br>शिपाई | 15870120.00 |
| | | **इमारत भाडे** | 24588.00 |
| **सरकारी अनुदाने**<br>वेतन अनुदान | 15163877.00 | **निवृत्तांचे देय वेतन** | 334487.00 |
| **सेवानिवृत्त स्टाफ** | 706243.00 | **वेतनेतर अनुदानावरील खर्च** 30% | 95158.00 |
| **वेतनेतर अनुदान** | 105000.00 | **वेतनेतर अनुदानावरील खर्च** 70% | 1760.00 |
| **EBC GRANT** | 1650.00 | **वेतन कपाती** | 7057887.00 |
| **अन्य जमा**<br>बॅंक खात्यातील व्याज | 2329.00 | **अनावर्ती खर्च** | 50820.00 |
| **विद्यार्थी फी जमा**<br>शैक्षणिक फी : 2004.00<br>प्रवेश फी : 8.00<br>शाळा सोडण्याचा दाखला : 110.00 | 2122.00 | **मंडळाच्या उसनवार रकमेचा परतावा** | 135000.00 |
| | | **आंतर विभाग हस्तांतरण** | 14304.00 |
| **वेतनातील कपात**<br>भ.नि.निधी : 1973632.00<br>व्यवसाय कर : 36200.00<br>सोसायटी; : 3346700.00<br>विमा : 287460.00<br>आयकर : 1212500.00<br>NPS : 201230.00<br>रेव्हेन्यु स्टॅंप : 165.00 | 7057887.00 | **वर्ष अखेरची शिल्लक**<br>CASH : 2673.50<br>SDCCBK KASARDE : 13.32<br>SBI DEOGAD : 6359.99<br>VKGB MUTAT :5081.30<br>SDCCBK MANCHE : 12169.00 | 26297.11 |
| **अनावर्ती जमा** | 52647.00 | | |
| **कर्ज आणि उचल परतफेड** | 119000.00 | | |
| **आंतर विभाग हस्तांतरण** | 14304.00 | | |
| **एकूण** | **23610421.11** | **एकूण** | **23610421.11** |

मुटाट- ता. **मे.परांजपे अँड असोशिएटस** **डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलकरिता**

सही- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

सही- दि.तु.घरपणकर
मुख्याध्यापक

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाचा 01.04.2023 ते 31.03.2024 या वर्षाचा जमा-खर्चाचा सारांश

| उत्पन्न | 2023-24<br>रु. पै. | खर्च | 2023-24<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक**<br>CAH ON HAND : 199.00<br>VKGB BK MUTAT : 64034.00 | 64233.00 | **पगार**<br>शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी: | 405500.00 |
| **मंडळाकडून कर्ज व उसनवार**<br>वेतन अनुदान | 405500.0 | **शैक्षणिक खर्च**<br>लेखापरीक्षक मानधन :8800.00<br>छपाई : 250.00<br>स्टेशनरी : 3260.00<br>HSC Registration : 1000.00<br>HSC TADA : 195.00<br>संकीर्ण खर्च : 911.20<br>प्रवास खर्च : 820.00<br>वर्तमान पत्रे : 596.00<br>कार्योत्सव : 360.00 | 16192.20 |
| **जमा फी**<br>शैक्षणिक फी : 15816.00<br>प्रवेश फी : 688.00<br>टर्म फी : 2636.00<br>वाचनालय फी : 430.00 | 19570.00 | | |
| **बँक खात्यातील व्याज** | 1735.00 | | |
| **अन्य जमा**<br>बारावी परीक्षा फी जमा | 25480.00 | **संकीर्ण खर्च**<br>**HSC EXAM FEES:** | 25480.00 |
| | | **वर्ष अखेरची शिल्लक**<br>CASH ON HAND : 1113.00<br>VKGBK A/C : 68232.80 | 69345.80 |
| **एकूण** | **516518.00** | **एकूण** | **516518.00** |

मुटाट- ता. **मे.परांजपे अँड असोशिएटस ,तळेरे**

सही- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

**कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाकरिता**

सही- दि.तु.घरपणकर

प्राचार्य/मुख्याध्यापक

# डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट आणि कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे

## मुख्याध्यापक/प्राचार्य शिक्षक आणि कर्मचारी वर्ग : सन २०२३-२४

| नाव | हुद्दा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| श्री दिलीप तुकाराम घरपणकर | प्राचार्य-मुख्याध्यापक | बी.ए.बी.एड. |
| श्री अनिल देविदास घुगे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| सौ.मृणाल रामदास कोयंडे | सहाय्यक शिक्षिका | बी.ए.बी.एड. |
| श्री रमेश न्हानू कविटकर | सहाय्यक शिक्षक | बी.एस्सी..बी.एड. |
| सौ.मृणाली मंगेश मळये | सहाय्यक शिक्षिका | बी.ए.बी.पी.एड. |
| श्री उदय गोपाळ कदम | सहाय्यक शिक्षक | एम.ए.डी.एड. |
| श्री निलेश गोविंद तांबे | सहाय्यक शिक्षक | एच.एस.सी.डी.एड. |
| श्री तन्मय सदानंद कोठावळे | सहाय्यक शिक्षक | बी. एस्सी. बी. एड. |
| श्री. अशोक बळवंत देसाई | सहाय्यक शिक्षक | बी.ए.पी.एड. |
| सौ. गीतांजली अशोक देसाई | सहाय्यक शिक्षिका | एम.ए.बी.एड. |
| श्री चेतन रघुनाथ पाळेकर | आय.सी.टी.निर्देशक | बी. कॉम. |
| श्री संजय नारायण धुपकर | कनिष्ठ लिपिक | बी.कॉम |
| श्री अरुण धोंडू साळुंके | नाईक | १० वी |
| श्री विजय विश्वनाथ ठाकूरदेसाई | शिपाई | ९ वी |
| श्री प्रविण जनार्दन झोरे | शिपाई | ९ वी |
| श्री लक्ष्मण बाळकृष्ण घाडी | शिपाई | १२ वी |

## कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट

### संस्था नियुक्त शिक्षक सन 2023-24

| | | |
|---|---|---|
| श्री. शैलेश कृष्णा पाडावे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| श्री. अजित न्हानु कविटकर | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| कु. निशा विजय पाळेकर | सहाय्यक शिक्षिका | एम.ए.बी.एड. |
| कु. प्रणाली सुरेश रायकर | सहाय्यक शिक्षिका | बी.कॉम.बी.एड. |

## माजी विद्यार्थी संघ : डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष : श्री. सुर्यकांत साळुंके | उपाध्यक्ष : श्री. अनिल पाळेकर | उपाध्यक्ष : श्री. प्रमोद चव्हाण |
| कार्याध्यक्ष : श्री. किरण प्रभू | सचीव : श्री.अमेय घाटे | कोषाध्यक्ष : श्री.सुरेश चिरपुटकर |
| सदस्य : श्री.यशवंत पाळेकर | सदस्य : श्री. चंद्रकांत पाळेकर | सदस्य : श्री. दत्ताराम राणे |
| सदस्य : श्री. प्रकाश तिर्लोटकर: | सदस्य : श्री. भास्कर पाळेकर | सदस्य : श्री. बाबाजी जोशी |
| सदस्य : श्री. संतोष निवेलकर | | |

# पुस्त प्रेष्य

प्रति

श्री/श्रीमती ------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------

प्रेषक:
मुख्य कार्यवाह : श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे,
मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ,
डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,
मु.पो.मुटाट,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग:पिन 416803.

प्रेषक:
कार्याध्यक्ष: श्री. विनायक कृष्णाजी लेले,
मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ,
स्वाती, ब, अमृतकुंभ सोसायटी,
चितळे पथ, दादर, मुंबई 400028.